**वादीचा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एन. जी. तनपुरे यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ९६ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपासणी प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विधीज्ञ श्री. के. आर. घाडगे यांच्यामार्फत :-**

२. वादी, मी व प्रतिवादी क्र. १ चे वडील विठ्ठल असे आम्ही तीघे सख्खे भाऊ आहे. वादग्रस्त मिळकतीचा मुळ गट क्र. ५१ असा आहे. आम्हा तिघा भावांचे वडील हयात असतानाच वाटप झाले. आमच्या वाटप झाले त्याप्रमाणे आम्ही आमच्या जमिनीची वहिती करत होतो. वादी गोविंद याला वाटपाप्रमाणे गट क्र. ५१/१, विठ्ठल यांनाा गट क्र. ५१/२/२ व माझ्या हिश्याला गट क्र. ५१/३ आला. आमचे वाटप अंदाजे ३५ ते ४० वर्षापुर्वी झाले. माझ्या हिश्याचा गट क्र. ५१/३ हा पुर्णपणे प्रतिवादी क्र. ६ मिनाक्षी यांना विकला. आजरोजी माझे गट क्र. ५१ मध्ये कुठलेही क्षेत्र शिल्लक नाही. तसेच माझ्या नावे कोंडवड गावात कुठलीही जमीन शिल्लक नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी गोविंद याने त्याचा गट क्र. ५१/१ मधील काही क्षेत्र प्रतिवादी क्र. ४ याला विकले.

३. वादग्रस्त मिळकत गट क्र. ५१/१ च्या पुर्व बाजुला प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची मिळकत आहे. गट क्र. ५१/१ च्या पश्चिमेस रस्ता आहे. गट क्र. ५१/२/२ च्या पुर्वेला रस्ता आहे. सदर रस्ता कॅनलचा आहे. सदर रस्त्याच्या पुर्व बाजुला कॅनलची चारी गेलेली आहे. चारीच्या पुर्व बाजुला गट क्र. ५१/२/१ चे क्षेत्र आहे. गट क्र. ५१/२/१ च्या पुर्वेला गट क्र. ५१/३ चे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ५१/१ च्या पश्चिम बाजुस असलेल्या रोडच्या पश्चिम बाजुस गट क्र. ५१/१ चे उर्वरित क्षेत्र आहे. मी आजरोजी मच्छिंद्र अशोक अल्हाड यांचेसोबत न्यायालयात आलो आहे. तो आज मला सोडून गेला. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी वादीसोबतच न्यायालयात आलेलो आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रात काय लिहिले याबद्दल मला माहित नाही. वादग्रस्त मिळकतीच्या मोजणीच्या वेळेस मी घटनास्थळी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ५१/१ मधील पुर्वेकडील काटवण क्षेत्र हे वादीचे असल्याचे मी खोटे सांगत आहे. गट क्र. ५१ मधील विहीर ही सामाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे क्षेत्राच्या दक्षिण बाजुस पुर्व-पश्चिम बांधावर असलेली नाराळाची झाडे ही प्रतिवादींची आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी वादीचा बांध फोडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीचे सांगण्यावरून खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2025.11.19 16:00:56 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-१९/११/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.